



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २६७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०९ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## 'अशा किती ममता बॅनर्जी आल्या, तरी देश वाकणार नाही'; मंत्री विखे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, अहिल्यानगर :** पश्चिम बंगालमधील सत्तांतरानंतर राज्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधत राजकीय वातावरण चांगलेच तापवले आहे. 'बांगलादेशी घुसखोरीमुळे पश्चिम बंगाल अस्वस्थ झाले होते. जनतेने ममता बॅनर्जी यांचे सरकार उखडून फेकत जंगलराज संपवले', असा घणाघात करत 'अशा किती ममता बॅनर्जी आल्या तरी देशाची राज्यघटना आणि लोकशाही अधिक मजबूत आहे', असे ठणकावत विखेंनी विरोधकांना थेट इशारा दिला. भाजपच्या विजयाचा उल्लेख करताना विखे म्हणाले, 'देशविरोधी आणि घुसखोरीला खतपाणी घालणाऱ्या शक्तींना जनता आता स्वीकारणार नाही. पश्चिम बंगालमध्ये जनतेने दिलेला कौल हा राष्ट्रहिताचा विजय आहे'.



**▶ एमआयएम आणि सिमीचे संबंध तपासा...**

नाशिकमधील गाजत असलेल्या धर्मांतर प्रकरणावरूनही मंत्री विखे यांनी तीव्र प्रतिक्रिया देत एमआयएमवर गंभीर आरोप केले. 'धर्मांतर प्रकरणातील मुख्य सूत्रधार निदा खान हिला पोलिसांनी संभाजीनगरमधून अटक केली असून, ती मागील ४० दिवसांपासून फरार होती. पोलीस तपासात एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांनी तिला लपण्यासाठी मदत केल्याची माहिती समोर आल्याचा दावा विखेंनी केला. संभाजीनगर हे पूर्वी सिमी या अतिरेकी संघटनेचे केंद्र म्हणून ओळखले जात होते. त्यामुळे एमआयएमचे काही लोक सिमीशी संबंधित आहेत का, याची सरकारने गंभीर चौकशी केली पाहिजे', अशी मागणी करत विखेंनी राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली.

**▶ जिल्ह्याबाहेर चारा जाणार नाही**

अहिल्यानगर जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्याबाहेर चारा निर्यातीवर निर्बंध घालण्याचा इशारा देत विखे पाटील यांनी प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. 'ज्या भागात पाणी उपलब्ध आहे, त्या शेतकऱ्यांना मोफत बी-बियाणे देऊन चारा उत्पादन वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या टंचाईची परिस्थिती नसली तरी भविष्यात संकट निर्माण झाल्यास प्रशासन सज्ज आहे', असे त्यांनी स्पष्ट केले.

**▶ जलजीवन मिशनची अक्षरशः वाट लावली...**

'जलजीवन मिशन योजनेतील कथित भ्रष्टाचार आणि निकृष्ट कामांवरूनही विखे पाटील यांनी संताप व्यक्त केला. ठराविक ठेकेदारांनी मनमानी पद्धतीने कामे केली. काही गावांत पाणीच उपलब्ध नसताना योजना राबवण्यात आल्या, तर काही ठिकाणी पाणी असूनही नागरिकांना थेंबभर पाणी मिळत नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला. अहिल्यानगर जिल्ह्यातील जल जीवन मिशनबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्याचे सांगत त्यांनी लवकरच पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांसोबत आढावा बैठक घेणार असल्याचे जाहीर केले. जल जीवन मिशन योजनेची अक्षरशः अवस्था झाली आहे. दोषींना सोडले जाणार नाही', असा इशाराही त्यांनी दिला.

## कांद्याचे भाव घसरले! क्विंटलला ५० रुपये दर नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये संताप

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, सटाणा :** अवकाळी पाऊस, गारपीट आणि उत्पादन खर्चाच्या वाढत्या ओझ्यामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणीत आता कांद्याच्या घसरलेल्या दरामुळे आणखी भर पडली आहे. सटाणा कृषी उत्पन्न बाजार समितीत गुरुवारी (दि.७) कांद्याला अवघा ५० रुपये प्रति क्विंटल दर मिळाल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आणि बाजार समिती परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

बागलाण तालुक्यातील कऱ्हे येथील शेतकरी जितेंद्र साळुंखे यांनी आपला कांदा विक्रीसाठी सटाणा कृषी उत्पन्न बाजार समितीत आणला होता. मात्र लिलाव प्रक्रियेदरम्यान त्यांच्या कांद्याला केवळ ५० रुपये प्रति क्विंटल इतकाच दर मिळाल्याचे समोर आले. हा दर ऐकताच उपस्थित शेतकरी संतप्त झाले. आधीच नैसर्गिक आपत्तीमुळे मोठे नुकसान सहन करावे लागले असताना बाजारातही योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. संतप्त शेतकऱ्यांनी कांदा भरलेला ट्रॅक्टर थेट बाजार समितीच्या कार्यालयासमोर उभा करून आंदोलन सुरू केले. 'उत्पादन खर्चही निघत नाही, मग शेती करायची कशी?' असा सवाल करून शेतकऱ्यांनी व्यापारी संगनमताने कमी दर देत असल्याचा आरोप केला; तसेच बाजार समिती प्रशासन शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यात अपयशी ठरत असल्याची टीकाही करण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच सटाणा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिस उपनिरीक्षक अमोल सूर्यवंशी, गणेश सोनवणे आणि बाळासाहेब टिळेकर यांनी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांशी संवाद साधत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी व्यापारी, बाजार समिती प्रशासन आणि शेतकरी यांच्यात मध्यस्थी करीत चर्चा घडवून आणली. दीर्घ चर्चेनंतर अखेर संबंधित कांद्याला १७५ रुपये प्रति क्विंटल दर देण्याचे मान्य करण्यात आले. त्यानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन मागे घेतले.

## परभणी शहराच्या विकासाला गती; जीएसटीचे ८० कोटी लवकरच मिळणार - आ.राहुल पाटील

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, परभणी :** महानगरपालिकेला जीएसटीचे तब्बल ८० कोटी रुपये लवकरच प्राप्त होणार असून, येणारा काळ हा परभणी शहराच्या सर्वांगीण विकासाचा असेल, अशी ठाम ग्वाही आमदार डॉ. राहुल पाटील यांनी दिली. शहराच्या विकासासाठी सर्व घटकांना विश्वासात घेऊन नवीन योजना राबविल्या जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

परभणी महानगरपालिकेअंतर्गत विविध समित्यांच्या नवनियुक्त सभापतींनी गुरुवारी दुपारी आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पदभार स्वीकारला. यावेळी महापालिकेत उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

गल्लीच्छ वस्ती निर्मूलन, घरबांधणी व समाजकल्याण समिती सभापती राजेश रणखांबे, महिला व बालकल्याण समिती सभापती अश्विनी जाधव, वैद्यकीय आरोग्य समिती सभापती अबोली कांबळे, विधी समिती व महसूल वॉर्ड समिती सभापती रुकसाना बेगम सय्यद अब्दुल हमीद जागीरदार, शहर सुधार समिती सभापती शुभांगी पाष्टे, माध्यमिक व पूर्व माध्यमिक तांत्रिक समिती सभापती शमशाद बेगम इलाही तसेच प्रभाग समिती 'ब' चे सभापती खान मुसद्दीकखान नुरुल्ला खान यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला.

या कार्यक्रमास काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबीरे, शिवसेना महानगरप्रमुख डॉ. विवेक नांवदर, महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर, सभागृहनेते सय्यद समी उर्फ माजू लाला यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी महापौर सय्यद इकबाल यांच्या हस्ते आमदार डॉ. राहुल पाटील यांचा महापालिकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

तसेच आयुक्त नितीन नार्वेकर यांनी सर्व नवनियुक्त सभापतींचे स्वागत करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाला विविध पक्षांचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शहराच्या विकासासाठी नव्या समित्यांमार्फत प्रभावी कामकाज होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## पिंपरी-चिंचवडमध्ये एकतर्फी प्रेमाचा भयंकर शेवट

**दि.०८, पिंपरी- चिंचवड :** पिंपरी- चिंचवडमध्ये एकतर्फी प्रेमातून थरारक हत्याकांड घडलं आहे. पाच महिन्यांपूर्वी ज्या तरुणाने आपल्या प्रेयसीवर जीवघेणा हल्ला केला होता, त्याच तरुणाची आता चाकू आणि चॉपरने हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून काळेवाडी पोलिसांनी अवघ्या काही तासांत दोन आरोपींना अटक केली आहे.

मृत तरुणाचं नाव सुभान अमित शेख असं आहे. सुभानचं शहरातील एका तरुणीवर एकतर्फी प्रेम होतं. मात्र, सदर तरुणी त्याला सातत्याने नकार देत होती. या नात्याला तरुणीच्या आईचाही तीव्र विरोध होता. पोलिसांच्या माहितीनुसार, पाच महिन्यांपूर्वी सुभानने संतापाच्या भरात तरुणीवर चाकूने वार करत तिच्या हत्येचा प्रयत्न केला होता. त्या प्रकरणात त्याला अटक करण्यात आली होती आणि तो जेलमध्ये होता. दरम्यान, अवघ्या पाच दिवसांपूर्वीच सुभान जामिनावर जेलमधून बाहेर आला होता. तो पुन्हा आपल्या मुलीला इजा पोहोचवू शकतो, अशी भीती सदर तरुणीच्या आईला वाटत होती. त्यामुळे त्यांनी आपल्या परिचयातील विशाल सूर्यवंशी आणि अनिकेत सूर्यवंशी यांना याबाबत माहिती दिली होती. तसेच, आमच्या मुलीचा नाद सोड, अन्यथा परिणाम वाईट होतील, अशी धमकीही सुभानला देण्यात आल्याचं समोर आलं आहे. गुरुवारी रात्री अकराच्या सुमारास हा वाद विकोपाला गेला. विशाल सूर्यवंशी आणि अनिकेत सूर्यवंशी यांनी सुभान शेख आणि त्याचा साथीदार अर्षद रमजान शेख यांच्यावर चाकू आणि चॉपरने हल्ला केला. अचानक झालेल्या या हल्ल्यात सुभान गंभीर जखमी झाला. त्याच्या हातावर, पोटावर आणि मानेवर सपासप वार करण्यात आले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या सुभानला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

## खा. लंके यांची प्रकृती बिघडली; तातडीने पुण्यात हलवले !!

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांची अचानक प्रकृती बिघडल्याची माहिती समोर आली आहे. तब्येत बिघडल्यानंतर त्यांना तातडीने पुढील उपचारांसाठी पुण्याकडे रवाना करण्यात आहे.

खासदार निलेश लंके यांना अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने स्थानिक डॉक्टरांनी प्राथमिक तपासणी केली. त्यानंतर अधिक उपचार आणि वैद्यकीय तपासण्यांसाठी त्यांना पुण्यातील रुबी रुग्णालयात हलवण्याचा निर्णय घेण्यात आला. या घटनेनंतर त्यांच्या समर्थकांसह अनेकांनी त्यांच्या प्रकृतीबाबत माहिती जाणून घेण्यासाठी संपर्क सुरू केला आहे. सध्या डॉक्टरांकडून त्यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. अहिल्यानगरमध्ये गेल्या २ ते ३ दिवसापासून निलेश लंकेवर उपचार सुरू होते, पण त्यांची तब्येतीत सुधारणा होत नव्हती, खबरदारी म्हणून डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना पुण्यात हलवण्यात आले.



**▶ खासदार निलेश लंके यांचा संदेश...**

**सप्रेम नमस्कार,** सततचे कार्यक्रम, आपणापर्यंत पोहोचण्यासाठी करावी लागणारी अविश्रांत धावपळ आणि त्यात यावर्षी उन्हाचा कहर आहे. या सर्वांच्या परिणामामुळे गेल्या दोन - चार दिवसांपासून मला बरं वाटत नसल्यामुळे दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. पुढील उपचारासाठी मी आज रुबी हॉस्पिटल, पुणे येथे दाखल झालो आहे. परंतु माझी तब्येत स्थिर असून डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार काही दिवस शक्तीची विश्रांती घ्यावी लागणार आहे.

यानंतर मी लवकरच आपल्या सेवेत पुन्हा एकदा उपस्थित होईन. आपल्या सदिच्छा आणि काळजीचे संदेश मला इथपर्यंत पोहचवत असून आपल्या शुभेच्छा आणि आशीर्वादाचे भरभक्कम बळ माझ्या पाठीशी आहे. त्यामुळे काळजी करू नये, मी लवकरच आपल्या सेवेत पुन्हा रुजू होईन.

## चंद्रपुरात एमडी ड्रग्जचा सुमारे ५ लाख ९० हजार रुपये साठा जप्त !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** जिल्ह्यात वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत नागपूर मार्गावरील खांबाडा शिवारातून एम डी ड्रग्जचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत नागपूर येथील एका युवकाला अटक करण्यात आली असून, दोन साथीदारांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. अमित कृष्णा गजभिये (वय २३), रा. इंदोरा, नागपूर असे आरोपीचे नाव असून आरोपी हर्षल टेंभेकर रा. इंदोरा, नागपूर आणि सोहेल शेख उर्फ सोहेल एसके रा. चंद्रपूर हे फरार आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वरोरा परिसरात गस्त घालत असताना नागपूरहून एक इसम एमडी ड्रग विक्रीसाठी चंद्रपूरमध्ये येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने वरोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खांबाडा शिवारात सापळा रचला.

दरम्यान, संशयास्पद हालचाली करणाऱ्या एका मोपेडस्वाराला पोलिसांनी अडवून झडती घेतली. तपासणीदरम्यान त्याच्याकडून १०१ ग्रॅम एमडी ड्रग पावडर आढळून आली. या अमली पदार्थाची अंदाजे किंमत ५ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अमित कृष्णा गजभिये (वय २३), रा. इंदोरा, नागपूर असे आहे.

चौकशीत त्याने नागपूर व चंद्रपूर येथील साथीदारांच्या मदतीने हा माल विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली. या



प्रकरणात हर्षल टेंभेकर रा. इंदोरा, नागपूर आणि सोहेल शेख उर्फ सोहेल एसके रा. चंद्रपूर हे फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. या कारवाईत पोलिसांनी एमडी ड्रग्जसह मोबाईल फोन आणि एमएच-३१-एफएच-२०४९ क्रमांकाची मोपेड जप्त केली. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे ५ लाख ९० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीविरुद्ध वरोरा पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचा नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक विनोद भुरले, सुनील गौरकार, पोहवा सुभाष गोहोकार, सतिश अवथरे, रजनीकांत पुठ्ठावार, दिपक डोंगरे, इम्रान खान, पोअं हिरालाल गुप्ता, किशोर वाकाटे, शशांक बदामवार तसेच सायबर सेल चे पोहवा कार्तिक खनके, पोअं अनिमेश भोंगळे यांनी केले.




## कर्मवीर भाऊराव पाटील

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज पुण्यतिथी. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्यामनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, (२७ मुलींसाठी) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, (१ मुलींसाठी) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची पुण्यतिथी. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# पाच राज्यातील निकाल म्हणजे जनमताचा यथार्थ कौल

नुकत्याच देशातील पाच राज्यातील निवडणुकांचे निकाल लागले. यामध्ये आसाम व पाँडिचेरी मध्ये जनतेने प्रस्थापितांना निवडून दिले आहे. तर केरळ व तामिळनाडू व पश्चिम बंगाल मध्ये बदल झाला आहे. केरळ मध्ये काँग्रेस प्रणित प्रणित आघाडी डाव्या आघाडीचा पराभव करून सत्तेत आली आहे. तामिळनाडू मध्ये सत्ताधारी द्रमुकचा पराभव झाला असून मुख्यमंत्री स्टॅलिन हे पराभूत झाले आहेत. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस पराभूत झाली असून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव झाला आहे. हे निकाल म्हणजे लोकांनाच असलेला कौल असेच म्हणावे लागेल तथापि पाचही राज्यांची परिस्थिती वेगळी आहे.

## १. पश्चिम बंगाल –

या राज्यात गेली सुमारे १५ वर्षे ममता बॅनर्जी सत्तेवर होत्या. डाव्या पक्षांचा अभेद्य गड भेदून त्यांनी सत्ता मिळविली होती त्यांचा स्वभाव अहंकारी व एकप्रकारे केंद्राला सहकार्य करण्याचा नव्हता राज्यपालांबरोबर सतत संघर्ष करणे, केंद्राचे अनेक ठराव धुडकावून लावणे ही त्यांची खासियत होती. त्या विरोधी आघाडीत होत्या पण निवडणुका आल्या की त्या स्वतंत्रपणे लढत. त्यांची व तृणमूल काँग्रेस ची बंगालमध्ये एक प्रकारची दशहत होती. तेथील आतापर्यंत झालेल्या निवडणुकांमध्ये हिंसाचार उफाळून आला होता. तेथे भाजपने यावेळी सर्व गोष्टींचा अभ्यास करून रणनीती ठरविली होती. अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली अगदी बारीक सारीक गोष्टींचे व्यवस्थित नियोजन केले होते. अर्थातच त्याचा फायदा भाजपाला झाला त्यांचे २०७ उमेदवार निवडून आले. सुवेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा भवानीपूर मतदारसंघात पराभव केला पश्चिम बंगालमध्ये भाजपाची लाट एवढी जबरदस्त होती कि तेथील २२ मंत्री निवडणुकीत पराभूत झाले. तेथे तृणमूलला केवळ ८० जगावर समाधान मानावे लागले. निवडणुकीचे निकाल जाहीर होताच ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा न देण्याचा निर्णय घोषित केला व सारे खापर निवडणूक आयोगावर फोडले या राज्यातील निवडणूक निर्णयाविरुद्ध त्या न्यायालयात जाणार आहेत असे कळते भाजपने प बंगालमध्ये गेल्या निवडणुकांपासूनच जोरदार संपर्क करून निवडणुकांची तयारी केली होती. आता राज्यपालांनी विधान सभा भंग केली असून नवीन विधानसभा अस्तित्वात येईल त्यामुळे ममता बॅनर्जीचा राजीनामा प्रकरण आता थांबले आहे.

## २. आसाम –

आसाम मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी तिसऱ्यांदा सत्तेवर आली आहे. भाजपने तेथे आसाम गण परिषद, युनायटेड पीपल्स पार्टी, लिबरल आणि बोडोलँड पीपल्स पार्टी याबरोबर युती केली होती. तेथे भाजप प्रणित आघाडीने १२६ पैकी १०३ जगावर बहुमत मिळविले बांगला देशी घुसखोर, आसामची अस्मिता, महिला सुरक्षा रोजगार या मुद्द्यावर निवडणूक लढविली होती. उद्योगांना कर्जे दिली. कामगारांच्या वेतनात वाढ केली. साहजिकच त्यांना युवक, महिला उधोजक अशा सर्व भरघोस पाठींबा मिळाला. मोदी यांनी गेल्या पाच वर्षात आसाम मध्ये ३० पेक्षा अधिक वेळा तेथे भेट दिली होती. त्यामुळे योजनांना गती आली मुख्यमंत्री म्हणून तेथे हिमंत बिश्व शर्मा यांची कामगिरी चांगली होती.

आसाम मध्ये काँग्रेस पक्षाच्या कोणत्याही मोठ्या नेत्याने आसामच्या निवडणुकांकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही.

## ३. केरळ –

केरळ मध्ये काँग्रेस प्रणित युडीएफ आघाडीने १४० जागांपैकी तब्बल १०२ जगावर विजय मिळविला आहे. केरळ मध्ये गेल्या दहा वर्षानंतर प्रथमच सत्तांतर झाले आहे. गेल्या पाच वर्षातील डाव्यांच्या कारभारावर जनता नाराज होती. मुख्यमंतयाची एकाधिकारशाही, राज्याची आर्थिक स्थिती ही मुख्य करणे पराभवाची आहेत. शबरीमाला चोरी प्रकरण बेरोजगारी, आदिक करणे पराभवास कारणीभूत ठरली. भाजपने तीन जागा प्रथमच जिंकल्या .व सहा जगावर दुसऱ्या क्रमांकाची मते मिळविली भाजपाने आपले बस्तान हळू हळू या राज्यात बसविले आहे. राज्याच्या ऐकवीस मंत्रांपैकी अनेक मंत्री पराभूत झाले.

## ४. तामिळनाडू –

तामिळनाडू प्रथमच द्रमुक व अद्रमुक हे पक्ष सत्तेबाहेर जाणार आहेत. द्रमुक चे मुख्यमंत्री स्टालिन यांचा पराभव झाला आहे. पहिल्याच प्रयत्नात टीव्हीकेचे विजयन यांचा मोठा विजय झाला आहे. एकूण २३४ जागांपैकी टीव्हीके पक्षाला १०७, तर द्रमुक व अद्रमुक यांना प्रत्येकी ६० व ४७ जागा आहेत. काँग्रेस पक्षाला पाच जागा आहेत इतर पक्षाला १५ जागा आहेत. कोणाचीही आघाडी न करता टीव्हीकेनी हे यश मिळविले आहे. आता विजयन १०७ संख्येसह कोणाला बरोबर घेऊन बहुमत सिद्ध करतात ते पाहायचे.

## ५. पाँडिचेरी –

येथे सत्ताधारी एनडीए पुन्हा सत्तेवर आली आहे. एकूणच प.बंगाल व तामीळनाडू मध्ये प्रस्थापितांना धक्का बसला आहे तर केरळ मध्ये दहा वर्षांनी युडीएफ सत्तेवर आली आहे. पाँडिचेरी व आसाम मध्ये बीजेपीने आपला गड कायम राखला आहे.

**– शांताराम वाघ, पुणे.**

# महाराणा प्रताप ना कभी हारे; ना अकबर कभी जीता!

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी, मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला. मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही. प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता. त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते. भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे. कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे. त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे. महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला. त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह. मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही



वंशातील काही राजे आपला स्वाभिमान, धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले. यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला. ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप. महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले. जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली. अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले. त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.

महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला. परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले. यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात, अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही. मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ, राणा सांगा, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल. हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल. असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले. ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली. राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते. ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते. याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता. अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला. ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले.दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते. महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला. हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले. राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले. महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दु:खी झाला. आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली. प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले. मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले. अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले. तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला. त्याचा पाय निकामी झाला. अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला. वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला. आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले, तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता. राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले. यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली. मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही. हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते. प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले. परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही. अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. २१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला. आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे. त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात. १९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली. भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते. जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील.

**परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!**

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## भोंदू चेहरा

मुश्किलीने अनावृत
होई भोंदूगिरी चेहरा
एखाद होईल फितूर
कडक शिष्य पहारा

पडद्याड खलप्रवृत्ती
झाकून ठेवते मोहरा
हळूचं निसटते खोटे
अफवा वारा भरारा

ताकदमिळे आगळी
राजाश्रय हा आसरा
जावाई होती उन्मत्त
खुर्चीवर बसे सासरा

बाबाश्रम बंदी शाळा
परिसरा तोचि दरारा
कुठूनही येईल गोळी
जपूनचं इकडेविहारा

अंधभक्त ते इतस्ततः
वेढाघातला परिसरा
बाबांच्या कारनाम्या
कोण घालेलकासरा

धाडस उघडतो तोंड
बाहेर पडतो पसारा
काळ्या कृत्या दिला
खणखर एक इशारा

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## झरी-बोरी रोडवरील अपघात प्रकरण उघड फरार आरोपी अखेर पोलिसांच्या जाळ्यात



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०८, परभणी :** ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील झरी-बोरी रोडवरील भीषण अपघात प्रकरणात फरार झालेल्या आरोपीला अखेर पोलिसांनी वाहनासह ताब्यात घेतले आहे. स्थानिक गुन्हे शाखा व ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई करत अपघात प्रकरणाचा छडा लावला. या संदर्भात ग्रामीण पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. २ मेच्या रात्री ११ ते ३ मेच्या पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास झरी शिवारात झालेल्या अपघातात गंगाधर रणगपत शिंदे यांना डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. घटनेनंतर आरोपी वाहनासह फरार झाला होता.

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलिस अधीक्षक व अपर पोलिस अधीक्षक यांच्या आदेशानुसार पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. तपासादरम्यान आरोपी डिग्रस येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून आरोपी योगेश त्र्यंबक रेनूर याला ताब्यात घेतले.चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. अपघातातील छोटे हत्ती वाहन हे जालालपूर येथील गणेश काळे यांच्या शेताजवळील कॅनॉलच्या बाजूला लपवून ठेवल्याची माहिती त्याने पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन वाहन जप्त केले.

आरोपीस वैद्यकीय तपासणीनंतर पुढील कारवाईसाठी ग्रामीण पोलिस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली चंदनसिंह परिहार, सिद्धेश्वर चाटे, राम पोंळ, नामदेव दुबे, मुकेश बुधवंत, पांडुरंग तुपसुंदर, माणिक डुके, फड, घोंगडे, उमर पुरी, जयश्री आकाड, हनवते आणि शेख यांच्या पथकाने केली.

## प्राध्यापक शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिरचा निकाल ९३.३३



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०८, माथेरान :** प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर या विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ चा निकाल अत्यंत समाधानकारक लागला असून विद्यालयाने यंदा ९३.३३ टक्के इतका उल्लेखनीय निकाल नोंदविला आहे. विद्यार्थ्यांनी मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.यंदाच्या परीक्षेसाठी विद्यालयातून एकूण ३० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा एकूण निकाल ९३.३३ टक्के लागला आहे. निकालामध्ये ०४ विद्यार्थ्यांनी डिस्टिंक्शन मिळवले, तर १४ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे.

तसेच ०७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले असून ०२ विद्यार्थ्यांनी पास क्लासमध्ये यश मिळविले आहे. विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये नयन सुभाष काळे याने ३८९ गुण मिळवत ७७.८० टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला. नम्रता रोहिदास क्षीरसागर हिने ३८८ गुण आणि ७७.६० टक्के मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. तृतीय क्रमांकावर ऋग्वेद वसंत कदम आणि देविका शेखर जाधव हे दोघेही प्रत्येकी ३७६ गुण व ७५.२० टक्क्यांसह संयुक्तपणे विराजमान झाले.विद्यालयाच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग तसेच पदाधिकाऱ्यांकडून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही असेच यश संपादन करून आपल्या शाळेबरोबर कुटुंबाचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## सर्वसामान्य जनतेच्या समस्या निराकरण करणारे गतिमान सरकार - आ.रविशेठ पाटील



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०८, पेण :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनखाली राज्यात सर्वाच ठिकाणी राबविले जात असून सर्वसामान्य जनतेच्या समस्यांचे निराकरण करणारे हा गतिमान सरकार असल्याचे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी पेणमध्ये आयोजित शिबिरात केले. पेणमधील नागरिकांसाठी सार्वजनिक विद्यामंदिर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उदघाट्न आमदार रविशेठ पाटील व मा. खासदार धैर्यशिल पाटील, नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्या उपस्थितीत्त करण्यात आले. या कार्यक्रमास पी.डी. पाटील, तहसिलदार तानाजी शेजाळ, नायब तहसिलदार प्रसाद कालेकर, नायब तहसीलदार नितीन परदेशी, नगरसेवक निळकंठ म्हात्रे, नगरसेवक आनंद जाधव,नगरसेवक पल्लवी कालेकर, नगरसेवक अजय क्षिरसागर, नगरसेवक संगीता लाड, अफ्रिन आखवारे,नगरसेवक प्रविण पाटील, मालतीताई म्हात्रे, राजिप सदस्य जनार्दन भस्मा, डी. बी. पाटील, साकव संस्थेचे अध्यक्ष अरुण शिवकर, समाजसेवक हरिष बेकावडे आदींसह मंडळ अधिकारी, तलाठी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले कि, पूर्वी एक दाखल्यासाठी तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय या ठिकाणी अनेक चकरा माराव्या गट होत्या परंतु केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्य सरकारने हे अभियान राबवून सामान्य जनतेला हे दाखले सहज उपलब्ध करून देण्याचे काम केले आहे. यावेळी प्रास्ताविकत तहसिलदार तानाजी शेजाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरात नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे काम होत असून नागरिकांना विविध दाखले, सातबाराचे वाटप करण्यात येत असून विद्यार्थ्यांसाठी विशेष करून आता उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करीत आहोत. सर्व नागरिकांनी या योजनांचा लाभ आपण घ्यावाअसे आवाहन तहसिलदार तानाजी शेजाळ यांनी सांगितले. यावेळी उपस्थित नागरीकांना जातीचे दाखले, सातबारा चे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# जलसंधारण कामातून शेतीला मिळणार नवी उभारी - सुजित झावरे पाटील

### काटाळवेढा येथील पाझर तलाव खोलीकरण कामाचा सुजित झावरे यांच्या हस्ते शुभारंभ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते काटाळवेढा येथील पाझर तलावाच्या खोलीकरण कामाचा शुभारंभ नुकताच पार पडला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून टाटा मोटर्स, नाम फाऊंडेशन व दैनिक सकाळ वृत्तसमुहाच्या सामाजिक दायित्व निधीतून हे काम करण्यात येत आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

सुजित झावरे पाटील यांनी यावेळी नाम फाऊंडेशनचे सर्वेसर्वा प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत त्यांचे आभार मानले व कामाबाबत माहिती देत आणखीन कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा केली. तसेच प्रत्यक्ष कामाला भेट देण्याबाबत विनंती केली. त्यांनीही कामे पूर्ण झाल्यावर कामांना भेट देण्याचे आश्वासन दिले.

काटाळवेढा येथील सदर पाझर तलाव हा माजी आमदार स्वर्गीय वसंतराव झावरे पाटील यांच्या कार्यकाळात त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे साकार झाला होता. आता या तलावाच्या खोलीकरणाच्या कामामुळे जलसाठा क्षमता वाढणार असून शेतीसाठी वर्षभर पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. परिणामी परिसरातील शेती उत्पादन वाढीस चालना मिळणार असल्याचे सुजित झावरे पाटील यांनी सांगितले.

यावेळी पुढे बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले की, काटाळवेढा गावात थाळवाटी पाझर तलावासह अनेक जलसंधारण आणि पाणी अडवण्याचे प्रकल्प स्वर्गीय वसंतराव झावरे पाटील यांच्या माध्यमातून व आपल्या माध्यमातून पूर्ण करण्यात आले आहेत. भविष्यातही ग्रामीण भागातील पाण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी अशाच प्रकारची विकासकामे राबवण्यात येतील. तसेच ग्रामीण भागात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याची समस्या गंभीर बनत चालली आहे. त्यामुळे जलसंधारणाची कामे ही काळाची गरज असून नागरिकांनी यापुढील काळात पुढाकार घेऊन गावे पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी नाम फाऊंडेशनचे विशाल नगरे, टाटा मोटर्सचे प्रसाद जाधव, शिक्षक नेते अमोल साळवे, खंडू भाईक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेणमधील शाळांची यशस्वी परंपरा कायम; एसएससी निकालात घवघवीत यश

### पेण परिसरात दहावीच्या निकालात विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी; अनेक शाळांचा १०० टक्के निकाल

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०८, पेण (रायगड) :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या एसएससी परीक्षा २०२६ चा निकाल जाहीर झाला असून पेण परिसरातील विविध शाळांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अनेक शाळांनी सलग १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची छाप पाडली आहे.

पेण एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या शाळांच्या निकालात भाळ येथील जी.एन.म्हात्रे विद्यालयाने १०० टक्के निकाल मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. इंग्लिश मीडियम स्कूल, पेणचा ९९.२७ टक्के,एम.एन.नेने कन्या विद्यालयाचा ९८.६२ टक्के, पेण प्रायव्हेट हायस्कूलचा ९४.८३ टक्के, जय किसान विद्या मंदिर, वडखळचा ८३.३३ टक्के तर पू.न. गोडसे विद्यामंदिर, वरसईचा ८२.६१ टक्के निकाल लागला आहे.

पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अँड.मंगेश नेने यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, पेण शिक्षण महिला समितीच्या श्रीमती सुमतीबाई वि. देव माध्यमिक विद्यालयाने सलग १५ व्या वर्षी १०० टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

विद्यालयातील नेहा मनोज म्हात्रे व कार्तिक राजेंद्र जाधव यांनी प्रत्येकी ९६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. हर्ष जितेंद्र म्हात्रे याने ९४.४० टक्के गुणांसह द्वितीय तर लिखित गुरुनाथ पाटील याने ९३.२० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. तसेच ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे १० विद्यार्थी विद्यालयात आहेत.

याशिवाय पेण शिक्षण महिला समितीच्या इंग्रजी माध्यम शाळेनेही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. कु.स्वरांजली महेंद्र पाटील व कु. विराज योगेश लकेशी यांनी प्रत्येकी ९४.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. कु.गार्गी गणेश गोरी हिने ९३.२० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच कु.पार्थ गणेश साळुंखे याने तृतीय क्रमांक पटकावला. शाळेतील ५५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत तर २१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा सुहासिनी देव, उपाध्यक्षा मेधा देवधर, मुख्याध्यापक संदीप भोर, मुख्याध्यापिका रोहिणी शिंदे, प्रशासन अधिकारी आर.आर.पाटील, पर्यवेक्षक सतीश पाटील, वर्गशिक्षक मिलन मोकल तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# ऐतिहासिक ज्यू दफनभूमीशी संबंधित वादग्रस्त जागेवरील अतिक्रमणावर तोडक कारवाई



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, पनवेल :** महानगरपालिका प्रभाग समिती ‘ड’ हद्दीतील अंतिम भूखंड क्रमांक २१७, मधील ऐतिहासिक ज्यू दफनभूमीशी संबंधित असलेल्या वादग्रस्त जागेवरील अनेक घरे आणि इतर बांधकामांवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने तोडक कारवाई करण्यात आली.

पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात न्यायालयीन आदेशानुसार ही निष्कासन कारवाई करण्यात आली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली. या कारवाईवेळी अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने तसेच प्रभारी प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे व पोलीस दल, अग्निशमन दल, रायगड सुरक्षा रक्षक, एमएफ चे सुरक्षा बल तसेच सर्व प्रभागातील अतिक्रमण कर्मचारी उपस्थित होते. अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या व अनधिकृत अतिक्रमण करणाऱ्यांच्या विरोधात महापालिकेने तोडक कारवाईचा बडगा उचलला असून यापुढेही अतिक्रमणांवर अशाच प्रकारची कारवाई पुढेही सुरू राहील, असे महापालिकेतर्फे सूचित करण्यात आले आहे.

# लोकमान्य टिळक कन्या विद्यालयाचा दहावी निकाल ९८.६३ टक्के




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** लोकमान्य टिळक स्मारक मडळ, चंद्रपूर द्वारा संचालित लोकमान्य टिळक कन्या विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.६३ टक्के लागला असून विद्यालयाने निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. फेब्रुवारी/मार्च २०२६ ला घेण्यात आलेल्यामाध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेचा निकाल शुक्रवार, दिनांक ०८ मे २०२६ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आला.

त्यामध्ये लोकमान्य टिळक कन्या विद्यालयाचा निकाल ९८.६३ टक्के लागला असून निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातून बोर्ड परीक्षेला एकूण २२० विद्यार्थीनी प्रविष्ठ झालेल्या होत्या. त्यापैकी २१७ विद्यार्थीनी परीक्षेत उत्तीर्ण झाल्या आहेत. प्राविण्य श्रेणीत ४६, प्रथम श्रेणीत ८१, द्वितीय श्रेणीत ७० तर पास श्रेणीत २० अशा एकूण २२० विद्यार्थीनी उत्तीर्ण झालेल्या आहे.

विद्यालयातून प्रथम येण्याचा मान कु.तेजस्वी किशोर राऊत हिला ९५ टक्के गुण मिळाले आहेत, द्वितीय स्थानी अंजली राजू उमाटे हिला ९१.८० टक्के तर तृतीय चेतना किशोर मेश्राम हिने ९१.४० टक्के गुण प्राप्त केले आहे. नेहा भागेश्वर चौधरी ९०.२० टक्के, श्रेया अतुल खाडीलकर ९०.२० टक्के, स्मृती सचिन दागमवार हिने ९० टक्के, तन्वी विनोद काकडे ८९ टक्के, सृष्टी सचिन दागमवार ८८.४० टक्के, तन्वी दीपक दारोकर ८७.४० टक्के, जान्हवी ज्ञानेश्वर भांदककर ८७.४० टक्के, अनुष्का रवींद्र कांबळे ८७.४० टक्के, मोहिनी गणेश दुरस्कर ८६.४० टक्के, सिध्दी देवानंद मोगरे ८६.४० टक्के, भूमिका धनराज बारसागडे ८६.२० टक्के, आसमा गौस्खॉ पठाण ८६.२० टक्के, प्राप्ती विकी दिकोंडवार ८५.४० टक्के तर स्वरा प्रवीण वऱ्हाटे हिने ८५ टक्के गुण प्राप्त करुन विद्यालयाचा नावलौकिक वाढविला. सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक सोहळा मंडळाचे सचिव गांगेय सराफ यांचे अध्यक्षतेखाली शाळेत घेण्यात आला.

याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना दुर्गपुरोहीत, पर्यवेक्षिका प्रांजली महादाणी, यशस्वी विद्यार्थीनी, त्यांचे पालक, सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारीउपस्थित होते. उत्तीर्ण विद्यार्थिनींचे मान्यवरांनी गुलाबपुष्प व फोल्डर फाईल देऊन त्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

याप्रसंगी मंडळाचे सचिव गांगेय सराफ सर यांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका दुर्गपुरोहीत नी मार्गदर्शन करुन यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक केले. संचालन पेटकर यांनी तर आभार पर्यवेक्षिका महादाणी यांनी केले.

# नाशिकमध्ये भक्तीचा महाकुंभ!

## श्री श्री रविशंकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त 'गोदावरी आरती' ने दुमदुमला रामकुंड परिसर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०८, विंचूर (नाशिक) :** नाशिक येथे गंगा आरतीच्या धर्तीवर नाशिकची जीवनवाहिनी असलेल्या गोदावरी मातेची 'गोदा आरती' आज शहराच्या आध्यात्मिक परंपरेचे जागतिक प्रतीक बनली आहे. रामकुंड येथील दुतोंड्या मारुती घाटावर मंत्रोच्चार, घंटानाद आणि सहस्र दीपांच्या प्रकाशात पार पडणाऱ्या या सोहळ्याने गुरुवारी सायंकाळी एक वेगळीच उंची गाठली. निमित्त होते, 'आर्ट ऑफ लिविंग'चे संस्थापक परमपूज्य श्री श्री रविशंकर यांचा ७० वा वाढदिवस आणि त्यानिमित्ताने आयोजित भव्य गोदा आरती.



**आध्यात्मिक संगम : 'अँडव्हान्स मेडिटेशन प्रोग्राम'**

आर्ट ऑफ लिविंग नाशिकतर्फे श्री श्री रविशंकर यांच्या वाढदिवसानिमित्त 'अँडव्हान्स मेडिटेशन प्रोग्राम'चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी देशभरातून ५० हून अधिक साधक नाशिकमध्ये दाखल झाले आहेत. या साधकांनी गुरुवारी सायंकाळी रामकुंडावर उपस्थित राहून या दिव्य आरतीचा अनुभव घेतला.

**गंभीर परिवाराच्या हस्ते विधीवत पूजन...**

पंजाब येथून आलेले आर्ट ऑफ लिविंगचे वरिष्ठ प्रशिक्षक तथा कालग्यानी सुनील गंभीर आणि अंजना गंभीर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. पारंपारिक वेशभूषेत पुजाऱ्यांनी केलेल्या वेदघोषात गंभीर परिवाराच्या हस्ते गोदा मातेचे पूजन व आरती संपन्न झाली. यावेळी संपूर्ण घाट परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

> गोदा आरती केवळ एक धार्मिक विधी नसून, ते निसर्ग आणि अध्यात्माशी एकरूप होण्याचे माध्यम आहे. दक्षिण गंगा मानल्या जाणाऱ्या गोदावरीच्या काठी हा अनुभव घेणे भाग्याचे आहे.
>
> – **शिल्पा सुदाम महाले,** आयोजक (आर्ट ऑफ लिविंग)

**ठळक वैशिष्ट्ये :-**
**स्थळ :** दुतोंड्या मारुती घाट, रामकुंड, नाशिक.
**विशेष अतिथी :** सुनील आणि अंजना गंभीर (पंजाब).
**सहभाग :** ५० हून अधिक राष्ट्रीय साधक आणि शेकडो नाशिककर.
**उद्देश :** श्री श्री रविशंकर यांचा ७० वा वाढदिवस व आध्यात्मिक प्रसार.

**भजन आणि वाढदिवसाच्या शुभेच्छा...**

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे आर्ट ऑफ लिविंगच्या साधकांनी श्री श्री रविशंकर यांना समर्पित केलेली भजने. ऑनलाईन भजन आणि प्रत्यक्ष गायनातून साधकांनी आपल्या गुरूंना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थितांनी अनुभवलेला ध्यान, अध्यात्म आणि संस्कृतीचा हा संगम नाशिककरांसाठी अविस्मरणीय ठरला.

या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन आर्ट ऑफ लिविंगच्या शिक्षिका शिल्पा सुदाम महाले यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी नितेश जाजू, तनुजा निंगूळकर, सीमा पाटील, स्नेहल महाले, तनिषा महाले यांच्यासह आर्ट ऑफ लिविंगचा नाशिक परिवार आणि मोठ्या संख्येने भाविक व पर्यटक उपस्थित होते.

## थोडक्यात

### महाराष्ट्र विद्यालयन खापरखेडाची ९२.१७ टक्के गुणांसह गरूडभरारी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** माध्यमिक शालांत परीक्षा वर्ग १० वी मध्ये एकूण निकाल ९२.१७ टक्के गुणासह महाराष्ट्र विद्यालय खापरखेडाने यशाची आपली उज्ज्वल परंपरा कायम राखली. परिक्षेत बसलेले एकूण २३० विद्यार्थ्यांपैकी २१२ विदयार्थी उत्तीर्ण झाले. पैकी प्राविण्य श्रेणीत २० विद्यार्थ्यांनी तर प्रथम श्रेणीत ५९ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. शाळेतून कु.अर्पिता अरविंद ढोरे ने ८९.४० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक प्राप्त केला असून कु.गौरी बालाजी हांडे ८९ टक्के गुणांसह द्वितीय तर कु. गुंजन बालाजी हांडे ८८.८० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला.

निकाल जाहीर होताच मुख्याध्यापक अरुण वडस्कर, पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, श्यामली चानीकर, वर्गशिक्षक शिंदे, बागडे, सौ.उईके, सौ.नांदेकर यांनी विद्यार्थी व पालकांचा पुष्पगुच्छ व पेढे भरवून सत्कार केला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्था अध्यक्ष सुधीर केदार, सचिव सुहासताई केदार यांच्यासह संपूर्ण कार्यकारिणी मंडळाने यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतूक केले.

## मोबाईलच्या विळख्यातून विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यासाठी जिंतूरमध्ये शिवकालीन युद्धकलेचे धडे

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०८, जिंतूर :** आजच्या डिजिटल युगात मोबाईल, कॉम्प्युटर आणि टीव्हीच्या आभासी दुनियेत गुरफटलेल्या विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचा वारसा देण्यासाठी जिंतूर येथे प्राचीन युद्धकला प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

जवाहर विद्यालय, जिंतूर येथे दिनांक ७ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित शिबिराच्या समारोप कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलताना उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या आहारी न जाता इतिहासातून प्रेरणा घेऊन शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनावे, असे आवाहन केले.या शिबिरात विद्यार्थ्यांना लाठी-काठी, तलवारबाजी, भाला, दांडपट्टा यांसारख्या शिवकालीन युद्धकलेचे प्रशिक्षण देण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि देशभक्तीची भावना निर्माण होते. विशेषतः मुलींसाठी असे प्रशिक्षण काळाची गरज आहे, असेही लाहोटी यांनी नमूद केले.

कार्यक्रमास प्राचार्य बळीराम वटाणे, नायब तहसीलदार प्रशांत राखे, संभाजी ब्रिगेड तालुका अध्यक्ष अभिजित देशमुख, संतोष काकडे, प्रशिक्षक शुभम गडकरी व अभिषेक पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे कोल्हापूर येथील प्रशिक्षकांनी सादर केलेले थरारक युद्धकला प्रात्यक्षिक होय. दांडपट्टा, तलवारबाजी आणि विविध युद्धकौशल्यांचे सादरीकरण पाहताना उपस्थितांचा श्वास रोखला गेला. पालक व विद्यार्थ्यांनी या प्रात्यक्षिकांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिर पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काजळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.५७ टक्के

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.०८, दापोली (रत्नागिरी) :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रु-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परीक्षेमध्ये मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील प्रविष्ट नियमित विद्यार्थ्यांचा निकाल ९८.५७ टक्के लागला आहे. यामध्ये कैवल्य प्रशांत जोशी ९६.२० टक्के गुण मिळवून प्रथम येण्याचा मान मिळवला. तसेच द्वितीय क्र. श्वेता शिवप्रसाद हत्ते ९५.०० टक्के, तृतीय क्र.अलमास दिलू मुल्ला ९०.०० टक्के गुण मिळवून तृतीय येण्याचा मान मिळवला. विद्यालयातून दहावीला एकूण १३८ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते.

त्यापैकी विशेष योग्यता श्रेणी २२, प्रथम श्रेणीत ६०, द्वितीय श्रेणीमध्ये ४२ व पास श्रेणीत१४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिकवणार्या शिक्षकांचे, संस्थेचे अध्यक्ष कामगार नेते भाईसाहेब जगताप, कार्याध्यक्ष दिलीपदादा जगताप, सरचिटणीस अॅड. विनोदभाई दळवी, चिटणीस अभिजीत गांधी व संतोषजी मांढरे तसेच सर्व संस्था पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य आबासाहेब हुलगे,उपप्राचार्य अर्जुन हुल्लोळी, पर्यवेक्षक शांताराम बैकर, शिक्षक प्रतिनिधी राजकुमार सूर्यवंशी, बसवंत शिरगिरे व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

## शहापूर तापमानवाढीच्या प्रश्नात लक्ष घालणार. खा. बाळ्या (मामा) म्हात्रे यांचे आश्वासन

अक्षराज : अनंत बोरसे

दि.०८, शहापूर (ठाणे) : गेल्या काही वर्षांपासून शहापूर तालुक्यातील तापमान वाढत असुन काही दिवसांपूर्वी तापमान ४०-४५ अंश सेल्सियस पर्यंत पोहचले होते. वाढत्या तापमानाबाबत गेल्या आठवड्यात सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंदे यांनी बैठक बोलावली होती त्यात अनेक मुद्यांवर चर्चा झाली. शहापूर पर्यावरण रक्षण मंच ची स्थापना करण्यात आली आहे.

तापमान वाढीबाबत या मंच च्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्णय घेतला आला होता. शुक्रवारी भिवंडी (ग्रामीण) चे खासदार बाळ्या (मामा) म्हात्रे यांच्या कार्यालयात या संबधी संतोष शिंदे यांच्या पुढाकाराने बैठक बोलावण्यात आली. यावेळी खासदार बाळ्या (मामा) म्हात्रे यांना



याबाबतचे सविस्तर निवेदन देण्यात आले त्याच बरोबर डॉ. अजित पोद्दार, भारंगी नदीचा सखोल अभ्यास असणारे कमलेश कुंदर, भानुदास भोईर, कामगार नेते कॉम्रेड विजय विशे, डॉ. नितिन मोहिरे, संध्या पाटेकर, शरद फर्डे यांनी तापमानवाढीची कारणे तसेच याबाबत काय ऊपाययोजना होणे गरजेचे आहे याबाबत खासदारांना अवगत केले तसेच या बाबत खासदार महोदयांनी प्रशासकीय यंत्रणां बरोबर, अधिकाऱ्यांबरोबर बैठक बोलवावी अशी विनंती करण्यात आली.

यावेळी खासदार बाळ्या (मामा) म्हात्रे यांनी शहापूर तालुक्यातील तापमान वाढीचा विषय गंभीर असुन या बाबत जिल्हाधिकारी तसेच इतर सरकारी अधिकाऱ्यांबरोबर आणि आपल्या प्रतिनिधींसोबत बैठक बोलावली जाईल आणि त्यात जास्तीत जास्त झाडे लागवड तसेच भारंगी नदीचे वाया जाणारे पाणी अडवण्यासाठी काय ऊपाययोजना करता येतील याबाबत चर्चा करु असे आश्वासन दिले. त्याच बरोबर केवळ शासकीय अधिकाऱ्यांवर अवलंबून न रहाता या बाबत लोकसहभाग तसेच सामाजिक संस्थाचे सहकार्य देखील तितकेच महत्त्वाचे आहे त्याच बरोबर सामाजिक कार्यकर्ते, संस्था यांनी सातत्याने पाठपुरावा करणे आवश्यक आहे अशी भावना व्यक्त केली.

यावेळी दिलिप भोपतराव, जेष्ठ नेते शंकर खाडे, नंदकुमार मोगरे, गणेश अवसरे, प्रमोद पाटोळे, संदीप बांगर, शैलेश राऊत, राजु गुजराथी, अन्वर शेख, मनिष व्यापारी, संतोष चौधरी, ज्ञानेश्वर तळपाडे, संजय भालेराव, विनोद पाठारी, शैलेश राऊत, जगदीश धनगर, सुजान वडके अनंत बोरसे, रविंद्र लकडे आदि सन्मानिय ऊपस्थित होते.

### शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कुलचा १० वीचा निकाल १०० टक्के




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या एसएससी बोर्ड दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवार ८ मे रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला. या परीक्षेत वीज केंद्राच्या प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूलने घवघवीत यश संपादन करत दरवर्षी प्रमाणे १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेच्या यशामुळे शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२६ या शैक्षणिक सत्रात पार पडलेल्या दहाव्या वर्गाच्या परीक्षेत शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूलचे एकूण ७४ विद्यार्थी बसले होते. अपेक्षेप्रमाणे सर्वच्या सर्व ७४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले यंदाच्या निकालात विद्यार्थिनींनी यशाची शिखरे गाठत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. शाळेतील सिद्धी विजय झोलदेव ह्या विद्यार्थीला ५०० पैकी ४८२ गुण मिळाले असून ९६.४०% गुण प्राप्त करत प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे तर ओजस्वी नंदू ताजने ह्या विद्यार्थीनीला ५०० पैकी ४७३ गुण मिळाले असून ९५.००% गुण प्राप्त करत द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे शिवाय तारुण्या मनोज वाघमारे ह्या विद्यार्थीनीला ५०० पैकी ४६० गुण मिळाले असून ९२.००% गुण प्राप्त करत तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे तर तन्वी राहुल चव्हाण ह्या विद्यार्थीनीला ५०० पैकी ४४९ गुण मिळाले असून ८९.८०% गुण प्राप्त करून शाळेतून चौथा क्रमांक प्राप्त केला आहे.

शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कुल मधून उत्तीर्ण झालेल्या एकूण ७४ विद्यार्थ्यांपैकी तब्बल २१ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा अधिक गुण प्राप्त करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

याप्रसंगी मराविम कर्मचारी शिक्षण संस्था व शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेच्या वतीने सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ईश्वरराव राऊत, सचिव गणेश चिखले, उपाध्यक्ष सुनील जालंदर, कोषाध्यक्ष किशोर बक्सरिया, सहसचिव संध्या ठाकरे सदस्य प्रशांत जालंदर, प्रतिभा खन्नाडे, उमेश राऊत, संजय चिखले, यामिनी घोरमारे, पुष्पा जथे, मुख्याध्यापिका मोनाली सुरकर व प्राचार्या वीणा पांडे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले व त्यांच्या पुढील उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## ऐरोली हॉस्पिटल मध्ये ब्लड बँक तसेच तिन्ही रुग्णालयात मिल्क बँक सुरू होणार

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** महानगरपालिका रुग्णालयांच्या इमारती सुसज्ज असून तेथील वैद्यकीय सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगर पालिकेने वाटचाल सुरु केली असून आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आरोग्य विभागाच्या घेतलेल्या आढावा बैठकीनंतर रुग्णालयांची प्रत्यक्ष पाहणी करण्यास सुरुवात केली आहे.

या अंतर्गत तुर्भे येथील माता बाल रुग्णालय व ऐरोली येथील राजमाता जिजाऊ रुग्णालय मधील सर्व विभागांना भेटी देऊन आयुक्तांनी सेवांमधील गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने मौलिक सूचना केल्या. याप्रसंगी त्यांच्यासमवेत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ. अजय गडदे, उद्यान विभाग उपआयुक्त स्मिता काळे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

ऐरोली राजमाता जिजाऊ रुग्णालयातील आरोग्य सुविधांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा यादृष्टीने त्याठिकाणी ईएनटी, ऑर्थो, डेंटल अशा नागरिकांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी तसेच आगामी काळात इन्फर्टिलिटी ट्रिटमेंट, गॅस्ट्रोलॉजी ट्रिटमेंट अशाही सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने ठोस उपाययोजना कराव्यात असे निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.

महापालिका रुग्णालयांत पोस्ट ग्रॅज्युएट वैद्यकीय संस्थेमुळे डॉक्टर्स उपलब्ध आहेत मात्र पॅरामेडिकल स्टाफची कमतरता भासते, ती दूर करण्यासाठी नियोजन करावे व त्याची त्वरीत कालमर्यादित अंमलबजावणी करावी अशाही सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या.

याप्रसंगी रुग्णांशी संवाद साधत त्यांचेही म्हणणे आयुक्तांनी जाणून घेतले. ऐरोली रुग्णालयात सोनोग्राफी विभागात दोनपैकी एक कर्मचारी रजेवर असल्याने महिलांना जास्त वेळ थांबावे लागले हे लक्षात आल्यानंतर आयुक्तांनी कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याचे निर्देश दिले.

रुग्णालयामध्ये पाच सुसज्ज मॉड्युलर ओ.टी. बनविण्यात आले असून त्यांचा संपूर्ण क्षमतेने वापर होण्यासाठी सुविधांचे नियोजन करावे असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

रुग्णांना व नागरिकांना दिला जाणारा आहार हा गुणवत्तापूर्ण असावा तसेच रुग्णांचे डाएट लक्षात घेऊन त्यानुसार बनविण्यात आलेल्या नाश्ता व भोजनाच्या वारनिहाय वेळापत्रकाचे काटेकोर पालन होत असल्याबाबत नियमित खात्री करावी असेही उपहारगृहातील सेवांची व तेथील खाद्यपदार्थांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर आयुक्तांनी सूचित केले.